**मत्स्य व्यवसाय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य**



शेतकऱ्यांचे नाव : **श्रीमती वच्छलाबाई महादेवराव गर्जे**

गाव / तहसील / जिल्हा : मादणी

संपूर्ण पत्ता (पिन कोड सह) : मु.पो.मादणी, ता. बाभुळगांव जिल्हा: यवतमाळ ४४५००१

संपर्क क्रमांक : ०७५८८७३७७७७,८२७५८१०१११

वय : ५५ वर्ष

शिक्षण : ४ था

कुटुंबाचा तपशिल : मुलगा, सून आणी नातू

मुख्य व्यवसाय :शेती

जोड धंदा :मत्स्य पालन

एकुण जमिन (कोरडवाहू, बागायती इ.) : ८ एकर

पाण्याचा स्त्रोत : विहीर सिंचन

पीक पध्दती :खरीप - उडीद, तुर , कापूस रब्बी- हरभरा, भाजीपाला-कांदा, लसून तुती
शेती औजारे : नांगर, वखर, स्प्रे,

१. घटकक्षेत्रास अनुसरून उल्लेखनिय कार्याबाबतची संक्षिप्त माहिती :

मी श्रीमती वच्छलाबाई महादेवराव गर्जे पारंपारीक पध्दतीने शेती करत असतांना शेतीमध्ये कापूस, सोयाबीन तुर या पिकाची प्रामुख्याने लागवड करत होती. शेती करत असतांना शेतामधील पिक हे पहिले रासायनिक पध्दतीचे असून ते आम्ही शेद्रीय पध्दतीवर करण्याचे ठरवेल याचे मार्गदर्शन कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग यांच्या मार्गदर्शनामुळे शेती हि शेंद्रीय पध्दतीने करण्याची सुरुवात केली. त्यामध्ये लसून, कांदा, हरभरा,उडीद, गहू , भुईमुंग या पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी शेंद्रीय पध्दतीचा अवलंब केला असून त्यामध्ये पूर्णपणे यश आले.

सन फेब्रुवारी २०१७ मध्ये कृषि विभागाच्या योजनेअंतर्गत शेत तलाव ३४ X ३४ मीटर व खोली ५ मिटर अंतराचे शेत तलाव तयार केले. याकरीता अतिरीक्त ८००००-१००००० स्वत:खर्च करून तयार केला त्यामध्ये १ लाख घनलिटर पाण्याची साठवनुक क्षमता तयार करून करून त्याचा फायदा शेती पिकाच्या सिंचनास करत असे. त्यामध्ये स्वत:च्या अनूभवाने व नियोजनाने त्यामध्ये शेन खत, कोबडी खत व मत्स्य खादयाचे मिश्रण करून ते शेत तलावा मध्ये टाकुन त्या तलावातील पाण्याचा वापर शेंद्रीय पाणी म्हणून करण्यात आले. या पाण्याचा वापर मी शेतातील लसून, कांदा, हरभरा,उळीद, गहू , भुईमुंग या पिकांना दिले व त्यामुळे माझा रासायनिक खताचा वापर खुपच कमी झाला. व पिकाच्या उत्पादनात १० ते १५ टक्यांनी वाढ झाली.


शेत तलावाचे महत्व लक्षात घेवून या शेततलावामध्ये मत्स्य पालन करण्याचा विचार केला व कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ येथुन मत्स्य व्यवसाय कशा करायचा याबद्दल चर्चा केली. असता सन २०१८ मध्ये शेत तलावामध्ये रोहू व कतला याचे ५ पिपे या प्रमाणे एका पिप्यामध्ये ५०० मत्स्यबीज नग याप्रमाणे सोडले

असतात. ८ महिने त्यांचे संगोपन करून अर्धा, पावून व एक किलो या प्रमाणे मासांच्या वजनात वाढ करून त्याचा जागेवरून भाव १०० ते १२५ रु किलो या प्रमाणे एकून २०० किलो विक्री केली त्यामध्ये माशाचा खादय खर्च २० ते ३० हजार वजा करून १,५०,००० ते १,६०,००० रु निवळ नफा मिळाला.

या वर्षा करीता सन जून २०१८ मध्ये १० पिपे मत्स्यबिज सोडले असून  माशाचे खादय खर्च ४० ते ५० हजार वजा करून २,३०,००० ते ३,००,०००  रु निवळ नफा अपेक्षती आहे.

तसेचे शेतीला पुरक व्यवसाय म्हणून मशरूम लागवड केली जाते त्यामध्ये ५०० बेड ची संख्या असून ४५ दिवसानंतर २५ ते ३० किलो सुकलेला मशरूम मिळतो तो ८०० ते ९०० रु प्रती किलो या दराने विक्री करून २५ ते २७ हजार नफा मिळतो. त्यामध्ये मजुरी व इतर खर्च ६ ते ७ हजार वजा करता निवळ नफा १८ ते २० हजार मिळतो. येनाऱ्या कालावधीमध्ये मलबेरी लागवडी पासून चहा (mulberry tea) ची निर्मीती प्रगती पथावर आहे.

२. कार्यास पुष्टी देणारी छायाचित्रे / वर्तमान पत्रातील कात्रणे / प्रमाणपत्रे इ.



कृषि विभाग

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आत्मा

शेतकरी/शेतकरी गट

प्रमाणपत्र

नांव सौ. वच्छलाताई महादेव गर्जे मु. मादणी ता. बाभुळगाव

आपण यवतमाळ जिल्ह्यात कृषि विभागाच्या मदतीने आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा अवलंब करून पारंपारिक पिक पध्दतीत फेर बदल केला.

कृषि क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करून ईतर शेतकऱ्यांना आदर्श निर्माण करून दिला. त्याबद्दल आपला गौरव म्हणून यवतमाळ कृषि महोत्सवामध्ये हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. आपण अशीच कामगिरी यापुढेही चालुच ठेवाल हीच अपेक्षा ठेवून, आपले मनपूर्वक अभिनंदन

ठिकाण : यवतमाळ
दिनांक :

श्री. नवनाथ कोळपकर
प्रकल्प संचालक (आत्मा) तथा
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ

श्री. अजय गुल्हाने (भा.प्र. से.)
जिल्हाधिकारी यवतमाळ तथा अध्यक्ष
कृषि महोत्सव समिती, यवतमाळ



दिव्य - मराठी / मंगळवार 15-1-19

दिव्य सिटी

लोकसंवाद • केळापूर, आर्णी, उमरखेड, दिग्रस तालुक्यातील शेतकऱ्यांचा समावेश

# मुख्यमंत्र्यांनी साधला जिल्ह्यातील शेतकऱ्यांसोबत 'व्हीसी'द्वारे संवाद

प्रतिनिधी | यवतमाळ

कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. माहिती व जनसंपर्क विभागाच्या 'लोकसंवाद' या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील ९ शेतकरी थेट मुख्यमंत्र्यांसोबत व्हीसीद्वारे बोलले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या महसूल भवनात पार पडला.

मुख्यमंत्र्यांसोबत संवाद साधणाऱ्यांमध्ये दिग्रस तालुक्यातील विठोली येथील रवींद्र राऊत, किन्ही (ता.केळापूर) येथील अभय कट्टेवार, अंबोडा (ता.आर्णी) येथील माधव राऊत, मादणी (ता. बाभुळगाव) येथील वच्छला गर्जे, सुकळी (ता. उमरखेड) येथील अशोक वानखेडे, राजचांदणा (ता. यवतमाळ) येथील अरविंद बेंडे, वडगाव (ता. दिग्रस) येथील भाऊराव भुसंगे, दोनाडा (ता. कळंब) येथील माणिक कदम आणि घाटंजी तालुक्यातील पारडी नस्करी येथील संजय निकडे या शेतकऱ्यांचा समावेश होता. मादणी येथील वच्छला गर्जे यांनी शेतामध्ये फळबाग, सामूहिक शेततळे, गट शेती या कृषी विभागाच्या योजनांचा फायदा कसा झाला याबाबत माहिती दिली. शेत तळ्यांच्या पाणी साठ्यामुळे शेतातील सीताफळ, आंबा, मोसंबी व इतर शेतमाल जगवता आला. तसेच या शेत तळ्यात आता मत्स्य बीज टाकून मासे उत्पादन घेणे शक्य झाले आहे. यातून दीड लाख रुपये उत्पन्न येऊ शकते, असे सांगितले. याबाबत संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वच्छलाताईंनी केलेल्या शेततळ्यातून मत्स्य शेती या अभिनव प्रयोगाची अन्य शेतकऱ्यांनी दखल घ्यावी. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

विठोली येथील रवींद्र राऊत यांनी रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे, तसेच आतापर्यंत परिसरातील १५० शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळवण्यात यश मिळाले असून त्यांच्यासाठी नियमित विनामूल्य प्रशिक्षण आयोजित केले जातात असे सांगितले. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेत कुटुंब प्रमुखाव्यतिरिक्त त्या कुटुंबातील इतरही सदस्यांचा समावेश करावा, अशी सूचना त्यांनी मुख्यमंत्र्यांना केली. यावर मुख्यमंत्री म्हणाले, शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची सूचना आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी विमा योजनेत कुटुंबातील इतरही सदस्यांना समाविष्ट करून घेण्याचा शासन स्तरावर नक्कीच विचार करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अंबोडा येथील माधव राऊत मुख्यमंत्र्यांशी बोलताना म्हणाले, ४५० शेतकरी या कंपनीचे सदस्य आहोत. धान्याच्या क्लिनिंग ग्रेडींगसाठी लागणारी मशीन तसेच दाल मिल सुरू केली आहे. त्यासाठी कृषी विभागाकडून १३.५० लाख रुपये प्राप्त झाले. गत वर्षी या माध्यमातून ५५०० क्विंटल डाळ प्रक्रिया केली असून सर्व शेतकरी मिळून ५५ लाख रुपये अतिरिक्त नफा झाल्याचे राऊत यांनी सांगितले. त्यांच्याशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांनी शेतमालावर प्रक्रिया करणे गरजेचे आहे. यामुळे त्यांच्या उत्पादनात तसेच उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. या वेळी जिल्ह्यातील इतरही शेतकऱ्यांनी शेडनेट, सामूहिक शेततळे, मागेल त्याला शेततळे, गट शेती, रेशीम शेती, कृषी यांत्रिकीकरण आदी विषयांबाबत मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला. लोकसंवाद या कार्यक्रमाला विविध तालुक्यातील १५ शेतकरी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी 'व्हीसी'द्वारे संवाद साधताना जिल्ह्यातील शेतकरी.

## मागेल त्याला शेततळ्यांमुळे ३६ लाख हेक्टरवर संरक्षित सिंचनाची सोय

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, केंद्र आणि राज्य शासन अनेक शेतीउपयोगी योजना राबवत आहे. १० हजार कोटींपेक्षा जास्त निधी कृषी विकासासाठी देण्यात आला आहे. मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार या महत्त्वाच्या योजना राज्य शासनाने राबवल्या आहेत. मागेल त्याला शेततळ्यांमुळे ३६ लाख हेक्टरवर संरक्षित सिंचनाची सोय निर्माण झाली आहे. राज्यात १ लाख ३७ हजार शेततळे, तर १ लाख ३० हजार सिंचन विहिरी पूर्ण झाल्या आहेत. माती परीक्षण कार्ड प्रत्येक शेतकऱ्याने घेणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपले उत्पादन लक्षात येते, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'महाराष्ट्र ॲग्रिटेक' प्रकल्पाचा ऑनलाइन शुभारंभ करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत दीड कोटी शेतकरी डिजिटल प्लॅटफॉर्मवर येतील. तसेच पेरणी ते कापणीपर्यंत सर्व माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध होईल, असेही ते म्हणाले.

## स्वच्छतेसाठी यवतमाळात आज प्रवचनकारांची कार्यशाळा

यवतमाळ | ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या सहभागातून स्वच्छ भारत मिशन ग्रामीण हा राष्ट्रीय ध्वजांकित कार्यक्रम राबवला जात आहे. उपलब्ध स्वच्छता सुविधांचा नियमित वापर, ग्रामीण कुटुंबाकडून स्वच्छतेच्या सवयीचा शाश्वत अंगीकार व्हावा, यासाठी भरीव प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी १५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता प्रवचनकारांच्या कार्यशाळेचे आयोजन केले आ[illegible] २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी [illegible] कालावधीत अभियान राज्य[illegible] राबवण्यात येणार आहे.




मा. खासदार श्रीमती भावना गवळी यांचे कडून पुरस्कार स्विकारतांना श्रीमती वच्छलाबाई गर्जे



कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ  यांचे कडून सत्कार स्विकारतांना श्रीमती वच्छलाबाई गर्जे



मा. जिल्हाधिकारी श्री. संचीद्रप्रताप सिंह  हे श्रीमती वच्छलाबाई गर्जे यांच्या शेतावर भेट दिली असता.




मा. श्रीमती आरती फुफाटे, जिल्हा परिषद अध्यक्ष यवतमाळ यांचे कडून पुरस्कार स्विकारतांना
श्रीमती  वच्छलाबाई गर्जे



कृषि दिन
१ जुलै २०१६
प्रगतिशील शेतकरी
सन्मानपत्र
के. वसंतरावजी नाईक जयंती
श्री/श्रिमती वच्छलाबाई महादेवराव गर्जे
गांव मादणी तालुका बाभूळगाव जिल्हा - यवतमाळ
आपली जिल्हा परिषद, यवतमाळ तर्फे
प्रगतिशील शेतकरी म्हणून सन्मानाकरीता निवड करण्यात आली आहे.
कृषि क्षेत्रामध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीकरीता दि. १ जुलै २०१६ रोजी 'कृषिदिनानिमित्त'
सदर सन्मानपत्र आपणास प्रदान करण्यात येत आहे.

डॉ.सौ.आरतीताई ह. फुपाटे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ
दीपक सिंगला, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
अनिल उर्फ बाळासाहेब मांगुळकर, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, यवतमाळ
डॉ.शरद डी.कुळकर्णी, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
जे.आर.राठोड, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ



काही उल्लेखनिय बाबी असल्यास त्याचा तपशिल

- प्रगतीशिल शेतकरी सन्मानपत्र जि. प. यवतमाळ दि. १ जुलै २०१६
- एबीपी माझा या वाहिनीला मुलाखत दि. २० एप्रील २०१८ कार्याची प्रसिध्दी